मराठी साहित्य मंडळ, कलबुरगी (गुलबर्गा)

या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

Scanned with OKEN Scanner

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

वर्ष : १२ अंक : ४

आषाढ, श्रावण, भाद्रपद शके १९४८
जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर २०२६

---

मानद संपादक : श्री. पवनकुमार देशपांडे
कार्यकारी संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर (९२४२१९३७९२)

संपादक मंडळ
श्री. विद्याधर मुरुगकर ★ सौ. वंदना किणीकर
डॉ. योगेश्वर देशपांडे ★ सौ. शीतल देऊळगावकर

---

**संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ,** स्टेशन बाजार,
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२.
दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७ email-s.satalkar@yahoo.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

---

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने
'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

(संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned with OKEN Scanner

# अंतरंग.....


- संपादकीय..... ३
- मराठी कथेतील कौटुंबिक आदर्श / प्रा. डॉ. राजीव यशवंते ७
- पुनरागमनाय च ! / किशोरी उपाध्ये २०
- गुलमोहर होता आले तर पाहावे..... / किरण शिवहर डोंगरदिवे २३
- धार आणि काठ : नरहर कुरुंदकर / हरी अग्निहोत्री २८
- केलो काय ? आणि झाले काय ? / यशवंत पाटील ३१
- भारतीय सिनेसंगीताचे भीष्म पितामह - अनिल विश्वास / प्रसाद माधव कुलकर्णी ४४
- कलात्मक स्वातंत्र्य - आवश्यकता आणि मर्यादा / सर्वोत्तम सताळकर ५८
- प्रतिभावंत आधुनिक कवी हरिवंशराय बच्चन / सुनील चौधरी ६३
- नवीन कायदा / सादत हसन मंटो ६७
- सांजवेळ / शोभा रामदुर्ग ७९
- स्मशान वैराग्य / डॉ. जयंत कित्तूर ८५
- अस्सल ग्रामीणतेचा साज : गावपांढरीच्या वैभवखुणा / डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात ९१
- मंडळाची वाटचाल.... ९६


Scanned with OKEN Scanner

# अस्सल ग्रामीणतेचा साज : गावपांढरीच्या वैभवखुणा

● डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात

## प्रस्तावना

सातारा येथे संपन्न झालेल्या नव्याण्णवव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते डॉ. अशोक शिंदे लिखित 'गाव पांढरीच्या वैभवखुणा' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. सदर पुस्तकात एकूण १८ लेख आहेत. हे सारे लेख वाचकांना थेट १९६०-७० च्या दशकात घेऊन जातात. नांगर, मोट, पोहरा, कावड, करंडा, काठवट, माळा, वावडी, कणगी, गंज, चोपणी, सूप, जाते, कंदील, अडकित्ता, बाज, गोधडी आणि आगळ ही लेखकाने लेखांना दिलेली शीर्षके जरी नुसती वाचली तरी, आता ५०-६० वयोगटात असणाऱ्या व्यक्ती आपल्या बालपणात जातात. त्यावेळचे खेडेगाव स्वयंपूर्ण होते. सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहत होते. लोकांचे शिक्षण कमी असले तरी, समज जास्त होती. पैसा कमी असला तरी, समाधान जास्त होते. लोकांच्या गरजा कमी होत्या. त्यामुळे ते सुखी-समाधानी होते. ती 'दुनिया' संवादावर तरलेली होती. त्या सुखी दुनियेचाच लेखकाबरोबरच मीही एक साक्षीदार आहे. आमचे खेळ, जीवनपद्धती, समाधानीवृत्ती आज कुठेही दिसत नाही. 'आमचे बालपण टायर ट्युब खेळण्यात गेले आणि आताच्या पोरांचं बालपण यु-ट्युबमध्ये चाललंय' याचे खूप वाईट वाटते. त्या पिढीचे अखेरचे शिलेदार आता निखळत निघाले आहेत. स्क्रीनवर व्यग्र असणाऱ्या पिढीच्या काळात या पुस्तकाचे मनापासून स्वागत करावेसे वाटते.

## शीर्षकाविषयी...

'गाव पांढरीच्या वैभवखुणा' या शीर्षकात पुस्तकाचे सारे सार सामावलेले आहे. प्रत्येक गावाला शिवार असते, तशी एक पांढरही होती. शिवारातली माती काळीभोर; खरीप व रब्बी पिकांस पोषक, तर पांढरीतली माती पांढरीशुभ्र; लहानग्यांना



Scanned with OKEN Scanner

अनुभवसंपन्न बनविणारी. त्या मातीत गावातील सर्व बालके एकत्र खेळायची. या पांढरीत खेळताना घडलेली प्रत्येक गोष्ट त्या बालकाच्या मन:पटलावर आयुष्यभरासाठी कोरली जाते. त्यांच्या मनावर कोरल्या गेलेल्या या घटनांना लेखकाने 'वैभवखुणा' असे संबोधलेले आहे. त्यामुळे लेखकाने पुस्तकाला 'गाव पांढरीच्या वैभवखुणा' हे दिलेले शीर्षक योग्य व समर्पक वाटते.

'सार सार को गहि लहै, थोथा देइ उड़ाय' असे एक संस्कृत वचन आहे. या वचनामधून सूपाचे कार्य अधोरेखित केले आहे. पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील 'सूप' वाचकांचे मन वेधून घेते. खरंतर चांगले धान्य स्वीकारून फोलकटे व टरफले उडविण्याचे काम 'सूप' करीत असते; पण या ठिकाणी गावगाड्यातील कालबाह्य होणाऱ्या वस्तू आपल्या हातातून निसटत आहेत, हे लेखकाला सूचकपणे येथे सांगायचे आहे. सूपाबरोबरच रंगीबेरंगी एखाद्या गोधडीची छटा मुखपृष्ठावर टाकून, लेखकाने वाचकांची पुस्तकाविषयीची उत्सुकता वाढवली आहे.

गावखेडं म्हटलं, की गावकरी, गावकी, गावठाण, गावथळ, गावदर, गावगन्ना, गाव-गाडा, गावकूस, गावखर, गावखाते, गावचावडी, गावठा, गावकुंप, गावडे यांच्याबरोबरच गावकंटक, गावगुंड, गावकुटाळ, गावकुठार आणि गावझोंडही आलेच; पण यांना वठणीवर आणण्यासाठी गावमामा आणि गावमावशी ही शहाणी माणसेही गावात असायची; त्यांच्या सल्ल्यानुसार गावपण जपलं जायचं. तसेच गावातील ग्रामदैवतावर या सर्वांचीच निष्ठा आणि श्रद्धा होती, त्यामुळे गाव तसं चांगलं राहायचं.... वेसीला टांगण्यापासून दूर राहायचं; पण ज्या गावात गावकंटक, गावगुंड, गावकुटाळ, गावकुठार आणि गावझोंड प्रबळ व्हायचे ते गाव मात्र पंचक्रोशीत टुकार समजलं जायचं. अशा प्रकारची दुहेरी गावे त्यावेळी होती. गावकऱ्यांच्या वागण्यावरून प्रत्येक गावाला एक वेगळी ओळख निर्माण झाली होती. पण लेखकाने दुखरी बाजू न मांडता; गावासंबंधीच्या अनेक चांगल्या आठवणी ललित्यपूर्ण शब्दांत मांडल्या आहेत. आता गावच राहिले नसल्याने ह्या वैभवखुणा नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याची खंत लेखकाने सदर पुस्तकातून व्यक्त केली आहे.

### अस्तित्व वैभवखुणांचे

सदर पुस्तकातील करंडा, काठवट, माळा, वावडी, चोपणी, कंदील, अडकित्ता आणि आगळ या वस्तू व त्यांचे काम आजच्या पिढीला ज्ञात नाही.



Scanned with OKEN Scanner

आजच्या फास्ट फुडच्या जमान्यात काठवटीतून बनवलेली भाकरी माणसाच्या आरोग्यासाठी लाभदायकच होती. काठवटतर विस्मृतीत गेलेली आहेच; पण आता भाकरीही हळूहळू कालबाह्य होत चालली आहे. याचे मनाला शल्य वाटते. त्यामुळेच लेखक म्हणतो, 'काठवट हे फक्त एक स्वयंपाकी साधन नसून ते आपल्या संस्कृतीचं वैभव, स्त्रीच्या कलेचा नि श्रमाचा पुरावा आणि कुटुंबाच्या पोषणाचा आधार असते.' 'वावडी' या वैभवखुणेचे वर्णन करताना लेखकाने डांब, उमाठा, खळे, पाथ, गुड, सूड्या, गुड्याची कणसं, मदान, उफणनी, हातनी, सरवा, उर्जिक, सावड, भारे, पेटे, रास असे अस्सल ग्रामीण शब्द वापरले आहेत. या खळ्यातील वावडीवर उभा राहून शिवारातील कामे केली जायची. आज यांत्रिकीकरणामुळे वावडीचं काम संपलं आहे. वावडीचा दुसरा अर्थ मोठा पतंग असाही होतो; पण तो लेखकाने येथे दिलेला नाही. माझे मूळ गाव करमाळा तालुक्यातील सावडी हे आहे. त्यावेळी आमच्या गावाबद्दल म्हटले जायचे 'सावडी सावडी दुपारनंतर वावडी.' गावातील काही लोकांच्यामुळे सावडीकरांवर कोणीही विश्वास ठेवत नव्हते. वावडी जशी हवेत उडते तसे, सावडीकरांचे शब्द हवेत उडणारे; म्हणजेच विश्वासास पात्र नसणारे असा त्याचा अर्थ होता. पण आज ती परिस्थिती राहिलेली नाही. पूर्ण गाव आता आध्यात्मिक बनलेले आहे. 'कंदील' हा तर आमच्या पिढीचा सोबती होता. सुरुवातीच्या काळात आमच्या पिढीला चिमनी आणि कंदिलाच्या उजेडात अभ्यास करावा लागला आहे. चिमनी ही नक्की वस्तू कशी होती ? हे आजच्या पिढीला सांगणेही अवघड आहे; पण ह्या चिमनी आणि कंदिलाच्या उजेडाने अनेकांचे जीवन प्रकाशमान झाले आहे. लेखकाने कंदिलाचा पुराणाश्मयुगापासूनचा प्रवास पुस्तकात सांगितला आहे. 'हा दिवा नंतर अश्मयुग, प्राचीन, अर्वाचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक काळात चूड, टेंभा, मशाल, काकडा, पणती, दिवटी, पोत, निरांजन, समई, लामणदिवा, आकाशदिवा अशा वेगवेगळ्या रूपात प्रकाशू लागला.' अशोक शिंदे यांनी अशी परिपूर्ण माहिती प्रत्येक लेखात दिली आहे. कंदिलाचे महत्त्व सांगताना लेखक म्हणतात, 'मानवाच्या कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक वा आध्यात्मिक जीवनाला समृद्धीचा प्रकाश देणारा कंदील हा ग्रामीण आणि कृषी संस्कृतीतील एक संपन्न आणि वैभवशाली वस्तू म्हणून गणला जात होता.'

करंडा हे 'सौभाग्यलेणं', माळा म्हणजे मळ्याचं वैभव, चोपणी हा



Scanned with OKEN Scanner

कलात्मक दृष्ट्याही मौलिक ठेवा आहे. 'अडकित्ता' हा आपल्या कलासंस्कृतीचा मौलिक ठेवा आहे. 'आगळ' संस्कृतीच्या सुरक्षेचा साक्षीदार असे म्हटले आहे. प्रत्येक लेखात अशी रंजकपणे माहिती लेखकाने दिलेली आहे. 'आगळ'बद्दल लिहिताना लेखकाची लेखणी सैल सुटलेली आहे. गडकिल्ल्यांपासून वाड्यांपर्यंतचा इतिहास त्यांनी या लेखात दिलेला आहे. आगळविषयी लिहिताना लेखक हळवा बनतो आणि म्हणतो, 'ज्या आगळाने मानवी संस्कृतीला स्वसंरक्षणाचा मूलमंत्र दिला, सुरक्षिततेची हमी दिली असे हे विश्वासाचे प्रतीक आणि घराचा खंबीर राखणदार आपण आज आहे त्या स्थितीत जपायला हवा.' आगळ नव्या पिढीला समजायला पाहिजे, असे लेखकाला मनोमन वाटते. प्राचार्य डॉ. महेंद्र कदम यांनीही आजीला 'एकत्र कुटुंबाचा आगळ' असे संबोधून आगळाचे आणि आजीचेही महत्त्व अधोरेखित केलेले आहे. अशा लेखांमुळे नव्या पिढीला या वैभवखुणा समजायला मदत होते.

नळाची तोटी फिरवताच पाणी येणाऱ्या पिढीला 'मोट', 'पोहरा' आणि 'कावड' यांचे महत्त्व समजणारच नाही. म्हणूनच मोटेला लेखक ग्रामीण लोकजीवनाशी जोडले गेलेले कृषी साधन, पोहऱ्याला ग्रामीण संस्कृतीचा सामाजिक व सांस्कृतिक वारसा तर कावड हे श्रम, बल, प्रेम आणि कौशल्याचे प्रतीक असल्याचे संबोधतो. सदर पुस्तकातील नांगर, कणगी, गंज, सूप, जाते, बाज आणि गोधडी हे कालबाह्य होण्याच्या मार्गावर असले तरी, अजूनतरी कालबाह्य झालेले नाहीत असे मला वाटते.

### अस्सल ग्रामीणतेचा साज

या ललित लेख संग्रहाला अशोक शिंदे यांनी ग्रामीणतेचा अस्सल साज चढवलेला आहे. गाव पांढरीतील अस्सल ग्रामीण शब्द पुस्तकातील पानांतून ओतप्रोत भरलेले आहेत. उदा. शिळवटी, मुरडाना, शिरवाळ, पारूग, वडवान, नाडा, सौंदर, फणी, बुचडा, वळकाडी, मोगरी, ठोकणी असे अनेक शब्द आलेले आहेत. तसेच दारे धरणारा 'दारुळ्या' व गंज लावणारा 'गंजाड्या' असे गमतीदार शब्दही आलेले आहेत. त्यामुळे ग्रामीण संस्कृती, आचार- विचार, जीवन पद्धती आणि चालीरीती यांचे दर्शन या पुस्तकातून होते. लेखकाची अर्पण पत्रिकाही वाचकांचे लक्ष वेधून घेते. 'ज्यांनी या वैभवखुणा जतन आणि संवर्धित केल्या त्या कारागीर आणि लोकसंस्कृती रक्षकांना' त्यांनी हे पुस्तक अर्पण केलेले आहे.



Scanned with OKEN Scanner

यातून लेखकाचा कृतज्ञताभाव आणि लोकसंस्कृती विषयीची तळमळ दिसून येते. लेखकाचे कौतुक करताना, पुस्तकाची पाठराखणकर्ते प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे म्हणतात, 'त्यांच्या आंतरिक तळमळीतून प्रगट झालेले लोकसंस्कृतीचे अक्षरलेणे म्हणजे गाव पांढरीच्या वैभवखुणा हा ग्रंथ आहे.'

**समारोप**

असे हे वैभवसंपन्न पुस्तक सर्वांनीच वाचायला हवे. म्हणजे आपल्या आजोबा पणजोबांनी जगलेले जीवन आपल्याला निदान पुस्तकाच्या माध्यमातून तरी अनुभवता येईल. पुस्तकाचे महत्त्व अधोरेखित करताना, प्रस्तावनेत डॉ. श्रीपाल सबनीस म्हणतात, 'हे समग्र लेखन भाषा, संस्कृती, समाजशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास विषयाला कवेत घेते.' सबब अनेक शास्त्रांच्या विद्यापीठीय अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणून या पुस्तकाचे मूल्य श्रेष्ठ ठरते. या वाक्यात पुस्तकाचे श्रेष्ठत्व सामावलेले आहे, असे पुस्तकाबद्दल म्हणावेसे वाटते.

**गावपांढरीच्या वैभवखुणा**
- डॉ. अशोक शिंदे
प्रकाशक - आस्वाद प्रकाशन, फलटण
किंमत - रु. १९५/-

**- डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
किसन वीर महाविद्यालय, वाई.
sangramthorat750@gmail.com
मोबा. : ९६०४०४६०८४

★ ★ ★



Scanned with OKEN Scanner